# देशी बियाणे वाटप कार्यक्रम

## दिनांक 31 मार्च 2025

**पार्श्वभूमी-** डेव्हलपमेंट सपोर्ट टीम पुणे या संस्थेच्या आर्थिक सहकार्याने सोलापूर जिल्ह्याच्या सांगोला तालुक्यातील वाणीचीचाळे या गावामध्ये दिनांक 31 मार्च 2025 रोजी पारंपारिक बियाणांचे वाटप अल्पभूधारक शेतकरी व एकल महिला शेतकरी याना करण्यात आले.एकूण 20 अल्पभूधारक शेतकरी व एकल महिला शेतकरी यांची निवड करून त्याना हे पारंपारिक बियाणे गावाच्या महिला सरपंचांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

**बियाणे वाटप कार्यक्रम** -पोषक अशा पारंपारिक पद्धतीच्या एकूण 15 प्रकारच्या बियानाचे वाटप करण्यात आले.दिवसेंदिवस केमिकल युक्त खतांचा वापर भाजीपाला व अन्नधान्य उत्पादनासाठी केला जातो त्याचे दुष्परिणाम सध्या समाजावर होत आहेत.म्हणून पारंपारिक बियानांकडे व उत्पादनांकडे शेतक-यांचे लक्ष वळवण्यासाठी पारंपारिक बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.मार्केट मध्ये मोठ्या प्रमाणात फळे, पाले-भाज्या विक्रीसाठी येत आहे .गावातील या पाले-भाज्या खरेदी करण्यासाठी महिलांची भरपूर प्रमाणात गर्दी होते त्याचा परिणाम आरोग्यावर होतो.त्याचा परिणाम जास्ती जास्त महिला आजारी पडतात.गावातील लोकांचे आरोग्य निरोगी राहावे या साठी डेव्हलपमेंट सपोर्ट टीम पुणे या संस्थेच्या वतीने वाणीचीचाळे या गावामध्ये पारंपारिक पद्धतीचा देशी भाजीपाला बी-बियाणे वाटप दिनांक 31 मार्च 2025 रोजी महिला सभागृह वाणीचिंचाळे येथे करण्यात आले.गावातील एकूण 20 अल्पभूधारक शेतक-यांना पारंपारिक देशी बियाणे वाटप करण्यात आले.सदर बियाणे वाटप कार्यक्रमाला गावच्या सरपंच सौ.प्रियांका गडहिरे, ग्रामसेवक श्री.सुनील साळुंखे ,माजी सरपंच चिदानंद स्वामी सर प्रगतशील बागायतदार रामलिंग पाटील अस्तित्व संस्थेचे अध्यक्ष शहाजी गडहिरे अस्तित्व संस्थेचे ॲडमीन प्रवीण सुर्यगंध तसेच गावातील,वाड्या वस्त्यांवरील शेतकरी,महिला युवक बहुसंख्येने उपस्थित होते.


LiFE
देशी बियाणे वाटप